स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड

सामाजिक शास्त्र मानवविद्या शाखे अंतर्गत पीएच.डी. (इतिहास) पदवीचा नोंदणी करिता सादर करावयाच्या प्रबंधाचा प्रारुप आराखडा.

संशोधनाचा विषय :

हरियाणातील रोड मराठा समाजाचा ऐतिहासिक दृष्टिकोनातून : एक अभ्यास.

संशोधक:

श्रीकांत बापूराव बोकारे

एम.ए. (इतिहास) बी.एड.

रा.पोखर्णी ता.नांदेड जि.नांदेड.

मार्गदर्शक :

डॉ.डी.डी.कोल्हेकर

एम.ए.पीएच.डी.

सहयोगी प्राध्यापक

कै.बाबासाहेब देशमुख गोरठकर कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, उमरी जि.नांदेड

सन जूलै - 2021

प्रस्तावना :-

अनेक संत महंत वीर पुरुषांच्या पराक्रमातून व बलिदानातून हा देश शश्वत पणाने जगाच्या पटलावर उभा आहे. या भारत देशावर अनेकांने आपले प्रभुत्व निर्माण केले शासन केले प्रशासन केले त्याच बरोबर अन्याय अत्याचार ही केले स्वदेशात राहणारा भारतीय माणूस पारतंत्र्यात जीवन जगू लागला अनेक वेळा गुलामगिरीचे जोखड झुगारुन देण्याचा प्रयत्न केला गेला परंतु तो अपयशी ठरला. याच्या पाठीमागचे प्रबळ कारण म्हणजे आमच्यातिल ऊफाळून येणारा प्रादेशिक वाद होय. छोटी छोटी राज्य व आप आपसातील संघर्ष होतोय. मग तो उत्तरेकडे असो वा दक्षिणेकडे त्यामुळे मुस्लिमांनी व ब्रिटिशांनी आपले स्थान मजबूत केले या सर्वांन वरील केवळ महाराष्ट्रात जन्माला आलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांनी मात केली. महाराष्ट्रातील मराठमोळ्या सवंगड्याना एकत्र करुन राष्ट्रीय एकात्मतेची त्यांच्यात भावना निर्माण करुन स्वराज्य निर्माण केले.

संघर्ष व स्वपराक्रमाच्या जोरावर स्वराज्य निर्माण केले व महाराष्ट्रात एका नव्या राज्य कारभाराला प्रारंभ झाला. स्वराज्य वाढले व विकसित ही झाले, परंतु ब्रिटिशांच्या वरचढ धोरणाने व गलथान कारभाराने अपार कष्ठातून उभे केलेले स्वराज्य इ.स.1818 साली नष्ट झाले. आपणाला या संशोधनाच्या माध्यमातून रोड मराठा समाजाचा ऐतिहासिक दृष्टीकानातून अभ्यास करावयाचा आहे. म्हणून प्रामुख्याने रोड मराठा समाजाचा ऐतिहासिक दृष्टीकानतून अभ्यास करावयाचा आहे. म्हणून प्रामुख्याने आपल्याला मराठयांच्या इतिहासाचा सखोल अभ्यास करावा लागणार आहे क्रमश:मराठ्यांच्या इतिहासांचे दोन कालखंड पडतात पहिला कालखंड हा छत्रपती शिवाजी व शिवकाळ आणि दुसरा कालखंड पेशवाई. मराठ्यांनी आपल्या पराक्रमाच्या जोरावर अटकेपार झेंडे लावले. सत्येचा परमोच्च कळस गाठला. परंतु नियतीने मात्र त्यांना अधिक काळ साथ दिली नाही. इ.स. 1761 साली पाणीपत च्या तिसऱ्या लढाईत अहमदशहा अब्दाली कडून मराठ्यांचा दारुण पराभव झाला. मराठ्यांचे फार मोठे नुकसान झाले अगणित संपत्ती व मनुष्य हानी झाली. असे म्हंटले जाते कि मराठ्यांची एक पिढीच पानिपतच्या युध्दात गारद झाली.

यानंतर मराठे विखुरले गेले आणि मराठा सत्तेची घडी विस्कटली ही पुन्हा कधीच बसवता आलीच नाही.

.

महादजी शिंदेनी तसा प्रयत्न केला पण तेवढे यश आले नाही. पराभूत मराठे मायदेशी परतले तर कांही मराठे उत्तर भारतातच स्थायीक झाले विशेषत: हरियाणातील सोनीपत, कर्नाल इतर जिल्ह्यात ही मराठा विखुरला गेला आहे. भीती पोठी स्थनिक राजाचे नाव आपल्या समोर लावून आपले जीवन जगू लागले ते रोड मराठा नावाने नंतर समोर आले, परंतु महाराष्ट्रातील मराठा आणि हरियाणातील रोड मराठा नावाने नंतर समोर आले. परंतु महाराष्ट्रतील मराठा आणि हरियाणातील रोड मराठा समाजाची नाळ एक असली तरी त्यांचा घनिष्ट संबंध प्रस्थपित झाल्याचे दिसत नाही. त्यामागची कारणे अनेक असतील असे वाटते हरियाणातील रोड मराठा समाजाची लोकसंख्या अंदाजे सात लक्ष एवढी असावी या संशोधनाच्या माध्यमातून रोड मराठा समाजाच्या सामाजिक, आर्थिक, धार्मिक, राजकीय व सांस्कृतिक जीवनाचा अभ्यास करावयाचा आहे. त्याच बरोबर आज पर्यंत चालत आलेल्या महाराष्ट्रातील परंपरा रुढी रोड मराठा समाजानी अंगीकारलेल्या आहेत का ? याचा ही अभ्यास करावयाचा आहे. त्याने अनेक गोष्टी चे साम्य टिकून ठेवलेले आहेत का व तेथील स्थानिक कोणकोणत्या गोष्टीचा स्वीकार केलेला आहे, हे पण अभ्यासवयाचे आहे अलीकडे इ.स. 2004 मध्ये मराठा सेवा संघानी कर्नाल येथे रोड मराठा आणि महाराष्ट्रातील मराठ्यांचे मनोमिलन अधिवेशन घेतलेले होते, तेव्हा पासून पाणीपत मधील रोड मराठा महाराष्ट्राशी नव्याने जोडला गेलेला आहे.

संशोधनाचे महत्व :-

इतिहासाच्या नियमानुसार एखांदी गोष्ट अप्रकाशित असेल तर ती प्रकाशात आणणे याला महत्वाचे स्थान असते त्याप्रमाणे मला वाटते की पानिपतच्या लढाई नंतर मराठ्यांना खूप मोठा अघात सहन करावा लागला. अनेक मराठे वीरगतीला प्रप्त झाले आणि शिल्लक राहिले ते इतरत्र विखुरले गेले. परंतु अशा मराठ्यांणवर कोणी प्रकाश टाकल्याचे माझ्या वाचनात आले नाही.

म्हणून हरियाणतील रोड मराठा समाजाचा ऐतिहासिक दृष्टिकोनातून एक अभ्यास हा विषय निवडून त्यांचा इतिहास प्रकाशात आणण्याचा प्रयत्न करणार आहे.

मराठ्यांच्या पराक्रमाला भाराताच्या इतिहासात अत्यंत महत्वाचे स्थान आहे. मराठ्यांचा इतिहास वगळून भारताचा इतिहास पूर्ण होऊ शकत नाही. हरियाणातील रोड मराठा समाजावर संशोधन होणे महत्वाचे आहे. या संशोधनाच्या माध्यमातून अनेक बाबीनवर प्रकाश टाकण्यात येईल.

संशोधनाची गरज :-

हरियाणातील रोड मराठा समाज व महाराष्ट्रातील मराठा समाज या दोन्ही मराठा समाजातील सामाजिक, सांस्कृतिक जीवनात मोठ्या प्रमाणावर साम्य आढळून येते मात्र हरियाणातील विस्थपित झालेल्या रोड मराठा समाज दुर्लक्षित झालेला दिसून येतो. हरियाणातील विस्थापित रोड मराठा समाजाचा इतिहास शास्त्रीय दृष्टिकानातून एक अभ्यास होणे आवश्यक आहे. म्हणून हरियानातील रोड मराठा समाजाचा ऐतिहासिक दृष्टीकोणातून एक अभ्यास अप्रकाशित असणारा हा मराठ्यांच्या इतिहासाचा भाग प्रकाशात यावा हि संशोधना मागची गरज आहे.

संशोधनाचे उद्देश :-

1) हरियाणातील रोड मराठा समाजाची पार्श्वभूमीचा समजून घेणे ?

2) महाराष्ट्रातील मराठा आणि रोड मराठा समाजाचा संबंधाचा अभ्यास करणे.

3) रोड मराठा समाजाच्या रुढी परंपरा व सांस्कृतिक जीवनाचा अभ्यास करणे.

4) रोड मराठा समाजाची सामाजिक व आर्थिक परिस्थिती अभ्यासणे.

5) रोड मराठा समाजाचा राजकीय सहभागाचा अभ्यास करणे.

6) रोड मराठा समाजातील लोकसंख्या व पदाधिकारी व नोकर वर्ग तपासणे.

7) रोड मराठा समाजातील स्त्रियांचे स्थान.

8) रोड मराठा समाजाचे शिक्षणचे प्रमाण तपासणे.

9) रोड मराठा समाजातील स्त्रियांचा राजकारणातिल सहभाग तपासणे.

10) रोड मराठा समाजाची भाषा, प्रथा,परंपरा, चालीरीती, राहणीमान इ.गोष्टीचा अभ्यास करणे.

वरील उद्देश समोर ठेऊन हे संशोधन वस्तुनिष्ठपणे करण्याचा प्रयत्न केला जाईल त्यासाठी लागणारे साधने उपलब्धतेनुसार वापरुन हे संशोधन परिपूर्ण करण्यात येईल.

उद्दिष्ट्ये :-

1) रोड मराठा समाजाच्या पार्शवभूमीच सखोल अभ्यास करणे.
2) हरियाणातील रोड मराठा समाज कोण याचा शोध घेणे.
3) रोड मराठा समाजातील स्त्रियांचे स्थान काय होते याचा शोध घेणे.
4) रोड मराठा समाजाच्या सामाजिक परिस्थीचा शोध घेणे.
5) महाराष्ट्रातील मराठ्यांची नाते सांगून रोड मराठा समाजाचा अभ्यास करताना अनेक बाबीचा अभ्यास करावा लागणार आहे. रुढी-परंपरा, सण, उत्सव, श्रध्दा, अंधश्रध्दा, भाषा, अहार, पोषाख आदींचा अभ्यास करावा लागणार आहे.

संशोधनाचे गृहीतके :-

1) हरियाणातील रोड मराठा व महाराष्ट्रातील मराठा समाज या दोन्ही समाजातील परंपरा चालीरीती, सांस्कृतिक जीवनातील साम्य आढळून येते.
2) हरियाणातील समाज जीवनात रोड मराठ्यांची भूमिका महत्वाची आहे.
3) हरियाणातील रोड मराठा समाजाची लोकसंख्या ही अनेक जिल्हे व गावांमध्ये विखुरलेली दिसते.
4) रोड मराठा समाजाचा हरियाणातील राजकीय जीवनावर मोठा प्रभाव दिसून येतो.
5) हरियाणातील रोड मराठा समाज हा कृषी प्रधान आहे.
6) रोड मराठा समाजास छत्रपती शिवाजी महाराजांचे वंशज असल्याचा अभिमान वाटतो.

संशोधनाची व्यप्ती व मर्यादा :-

'हरियाणातील रोड मराठा समाजाचा ऐतिहासिक दृष्टिकोनातून एक अभ्यास' या विषयाच्या संशोधनासाठी अणि अभ्यासाची व्यप्ती व मर्यादा ही हरियाणातील रोड मराठा समाजापुरती मर्यादित असेल हरियाणातील रोड मराठा समाजाचे वास्तव्ये असलेले कांही जिल्हे व गावांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

संशोधनाची साधने :-

हरियाणतील रोड मराठा समाजाचा ऐतिहासिक दृष्टिकोनातून एक अभ्यास या विषयाच्या संशोधनासाठी वर्णात्मक, व विश्लेषनात्मक संशोधन पध्दतीचा उपयोग केला जाणार आहे. या संशोधनासाठी प्राथमिक आणि दुय्यम दर्जाच्या साधनांचा उपयोग केला जाणार आहे. प्राथमिक साधनामध्ये अप्रकाशित कागद पत्रे प्रकाशित कागदपत्रे इत्यादी, संशोधनास आवश्यकता असेल तेथे मुलाखतीच्या माध्यमातून संशोधन केले जाईल. इंटरनेट, इ-बुक्स, वृत्तपत्रे, मासिके, स्थानिक भाषेतील उपलब्ध साधने इत्यादींचाही संशोधनात उपयोग करण्यात येईल.

संशोधन पध्दती :-

हरियाणातील रोड मराठा समाजाचा ऐतिहासिक दृष्टिकोनातून एक अभ्यास या विषयाच्या संशोधन पध्दती मध्ये संशोधन करण्यासाठी वर्णनात्मक व विश्लेषात्मक मुलाखत संशोधन पध्दतीचा अवलंब करण्यात येणार आहे. वरील विषयाचा अभ्यास करताना प्राथमिक साधने, दुय्यम साधने, व तात्कालीन अस्मल साधनांचा तसेच प्रकाशित अप्रकाशित साधनांचा प्रस्तुत संशोधनात वापर केला जाईल, आवश्यकतेनुसार पुणे येथील भारत इतिहास संशोधन मंडळ, पेशवाई दप्तर याठिकाणी भेट देऊन प्रस्तुत विषयाच्या संशोधन विषयाचा अभ्यास करण्यासाठी ग्रंथालयातील संदर्भ साधनांच्या सहाय्याने प्रस्तुत विषयास पुर्णत्वास नेण्याचा पूर्ण प्रयत्न केला जाईल.

प्रकरणाची विभागणी :

प्रकरण 1 ले : हरियाणाची ऐतिहासिक पार्श्वभूमी

प्रस्तुत प्रकरणामध्ये हरियाणाच्या पार्श्वभूमीचा आढावा घेण्यात येईल या मध्ये भौगोलिक, सामाजिक, आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक या मुद्यांच्या अनुशंगाने अभ्यास केला जाईल.

प्रकरण 2 रे : मराठा समाजाची ऐतिहासिक पार्श्वभूमी

प्रस्तुत प्रकरणामध्ये हरियाणातील रोड मराठा समाज व महाराष्ट्रातील मराठा समाज या समाजाच्या पार्श्वभूमीच्या अंगाने अभ्यास करण्यात येणार आहे, या मध्ये हरियाणाचा पूर्व इतिहास मराठ्यांचे सामाजिक, आर्थिक, राजकिय, सांस्कृतिक व धार्मिक या मुद्यांच्या अनुषंगाने मराठ्यांच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीचा अभ्यास केला जाईल.

प्रकरण 3 रे : महाराष्ट्रातील मराठा आणि रोड मराठा सबंध

प्रस्तुत प्रकरणामध्ये महाराष्ट्रातील मराठा समाज व रोड मराठा समाज यांच्यातील नाते किंवा यांच्यातील संबंध कशा प्रकारे होता या अनुषंगाने अभ्यास करण्यात येणार आहे.

या मध्ये या दोन्ही समाजातील सामाजिक, सांस्कृतिक, जीवनात साम्य कशा प्रकारे आहे याचा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण 4 थे : रोड मराठा समाजाचा विस्तार :

प्रस्तुत प्रकरणामध्ये हरियाणातील रोड मराठा समाजाचा विस्तार या अनुषंगाने अभ्यास करण्यात येईल या मध्ये हरियाणातील रोड मराठा समाज कोणकोणत्या जिल्हयात ,तालूक्यात गावात, वास्तव्यास आहे व त्यांचा व्यवसाय, उद्योग, उपजीवीकेची साधने, सामान्य वर्ग, स्त्रीयांचे उद्योग व त्यांच्या लोकसंख्येचे प्रमाण किती आहे याचा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण 5 वे : रोड मराठा समाजाचे सामाजिक व धार्मिक जीवन

प्रस्तुत प्रकरणामध्ये हरियाणातील रोड मराठा समाजाचे सामाजिक व धार्मिक जीवन या अनुषंगाने अभ्यास करण्यात येणार आहे.

या मध्ये रोड मराठा समाजातील समाज जीवनातील स्त्री जीवन, पुरुष जीवन त्यांच्या कथा परंपरा चा त्यांचे राहणीमान खान-पान शिक्षण व्यवस्था अशा अनेक घटकांच्या अनुषंगाने त्याच्या सामाजिक जीवनाचा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण 6 वे : रोड मराठा समाजाचा शैक्षणिक व आर्थिक दर्जा :

प्रस्तुत प्रकरणामध्ये हरियाणातील रोड मराठा समाजाचा शैक्षणिक व आर्थिक परिस्थितीच्या अंगाने अभ्यास करण्यात येणार आहे, यामध्ये रोड मराठा समाजाचे शैक्षणिक स्थिती उत्पादनाचे स्त्रोत उद्योगधंदे, व्यापार यावर आधारित, रोड मराठा समाजाचे जीवनमान या अनुषंगाने अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण 7 वे : रोड मराठा समाजाचा राजकीय सहभाग :

प्रस्तुत प्रकरणामध्ये हरियाणातील रोड मराठा समाजाचे हरियाणातील राजकीय सहभाग या अनुषंगाने अभ्यास करण्यात येणार आहे.

या मध्ये हरियाणा राज्यातील राजकीय सहभाग रोड मराठा समाजाचा किती आहे राजकारणातील त्यांचे स्थान किती प्रमाणात आहे या समाजातील राजकारणाचा प्रभाव कसा आहे स्त्रीयांचा राजकारणातील सहभाग त्यांचे प्रमाण या अनुषंगाने अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण 8 वे : निष्कर्ष :

प्रस्तुत प्रकरणामध्ये वरील संशोधनातून प्राप्त होणारे माहितीच्या आधारे निष्कर्ष मांडले जातील.

संदर्भ ग्रंथ :-

विश्वास पाटील - पाणीपत (राजहंस प्रकाशन)

कौस्तुभ कस्तुरे - पेशवाई (मराठ्यांच्या इतिहासातील स्वर्ण पान)
Refter Publication 2 जानेवारी 2020

पांडुरंग बलकवडे - सिध्दांत 14 जानेवारी - 2018

डॉ.गो.खोबरेकर - मराठा कालखंड (भाग-2) 1707-1817
महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मुंबई 1988.

प्रमोद ओक - पेशवे घराण्यांचा इतिहास
प्रकाशक : (GENERICI 2011 संस्करण
(1 जानेवारी 2015)

डॉ.स्टुअर्ड गार्डन - द.देशमुख वतनदार

अनुवाद र.कु. कुलकर्णी - छत्रपती पेशवा मराठाज
प्रकाशक (Demanod बुक)

खोबरेकर वि.गो - मराठ्यांच्या स्वाऱ्यांचे मुक्काम, मुंबई
मराठी ग्रंथ संग्रालय मुंबई ३ 1977

पवार जयसिंगराव - मराठी शाही चा मागोवा मंजूषा प्रकाशन 1993

ग्रँड डफची मराठयांची बखर - (अनु डेव्हिड केपन साहेब 1916)

गोखले कमल - शिवपुत्र संभाजी ज्ञानविज्ञान,
विकास मंडळ, पुणे.

पेशवाई दप्तर पुणे

पुण्य नगरी न्यूज पेपर - शकुनी मामा कुठला ? दि.23.08/2021.
ता. 23.08.2021

वसंतराव मोरे	-	पानिपत के रोड मराठो का इतिहास
R.S. Chaurasiya	-	History of Maratha Publisher Atlantic-2004
Udyas Kulkarni	-	Solstice at panipat Pubisher :
		Mula Multha Second संस्करण 4 एप्रिल 2012
Abhas warma	-	Third Battle of Panipat
		Publisher Bhartiya Kala
		1 Jan - 2013
Kashiraj Pandit	-	Sadashivrao Bhau Practiside the 108
		Repetition ons of Surya Namaskar (108*12)
Vasntrao More (Mulakhat)	-	Tarun Bharat News 13 Jun -2021
Wikipedia	-	Panipat
History of Maratha Culture	-	Author - R.C. Sharma
and empire		Publisher : Global Publication
P.I. Mhajan	-	History of the Maratha
		Pubisher : Commonwealth addition - 2019

संशोधक	मार्गदर्शक
श्रीकांत बापूराव बोकारे	**डॉ.डी.डी.कोल्हेकर**
एम.ए.इतिहास, बी.एड्.	एम.ए.पी.एच.डी.(इतिहास विभाग प्रमुख)
रा.पोखर्णी ता.जि.नांदेड	कै.बाबासाहेब देशमुख गोरठेकर कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, उमरी जि.नांदेड